**कृपया प्रसिध्दीसाठी** **21 एप्रिल 2009**

## बाळासाहेब ठाकरे यांची एसआरए योजना काँग्रेस सरकारने बंद केली - सुभाष देसाई

**मुंबई, मंगळवार:** " 40 लाख झोपडपट्टीवासीयांना घरे देणारी एसआरए योजना काँग्रेस सरकारने गुंडाळून ठेवली त्याबद्दल काँग्रेसला धडा शिकवल्याशिवाय मुंबईचे झोपडपट्टी धारक राहणार नाहीत" असे प्रतिपादन शिवसेनेचे ज्येष्ठ नेता श्री. सुभाष देसाई यांनी केले. भाजपा-शिवसेना युतीचे उत्तर मुंबईतील उमेदवार श्री. राम नाईक यांच्या प्रचार सभेत चारकोप येथे श्री. देसाई बोलत होते. "भाजपा-शिवसेना युतीचे सरकार केंद्रात निवडून आल्यानंतर ही योजना पुन्हा सुरु करण्यास आम्ही भाग पाडू " असा निर्धारही यावेळी श्री. देसाई यांनी व्यक्त केला.

"आतापर्यंत लोकांना वाटायचे गूळ स्वस्त असतो आणि साखर महाग. विमान प्रवास सामान्यांना पडवरण्यासारखा नाही कारण हवाई इंधन डिझलेपेक्षा कितीतरी पटीने महाग आहे असे चित्र सर्वत्र असते. मात्र काँग्रेसच्या राज्यात गूळापेक्षा साखर स्वस्त आणि डिझेलपेक्षा विमानाचे इंधन फारच स्वस्त असे विचित्र अनुभवयास मिळत आहे. असा उलटा कारभार करणाऱ्या काँग्रेस सरकारला मतदार धडा शिकवतीलच", असा विश्वास उमेदवार श्री. राम नाईक यांनी यावेळी व्यक्त केला. भाजपा-मुंबईचे अध्यक्ष श्री. गोपाळ शेट्टी यांनी यावेळी बोलताना चारकोप येथील प्रस्तावित मेट्रो कारशेडचा उल्लेख करुन सदर प्रकल्पामुळे एकाही नागरिकाला आम्ही बेघर होऊ देणार नाही असा निर्धार व्यक्त केला.

सदर सभेमध्ये शिवसेना विभाग प्रमुख श्री. विनोद घोसाळकर, भाजपा महाराष्ट्राचे उपाध्यक्ष श्री. भाई गिरकर, भाजपा मुंबईचे उपाध्यक्ष श्री. जयप्रकाश ठाकूर , भाजपाचे नगरसेवक व जिल्हा अध्यक्ष श्री. योगेश सागर, नगरसेविका श्रीमती शैलजा गिरकर, नगरसेविका श्रीमती शुभदा गुडेकर उपस्थित होते. भाजपा चारकोप विधानसभेचे अध्यक्ष श्री. बाबा सिंह यांनी उपस्थितांचे स्वागत केले. श्री. राजेंद्र हुले यांनी सभेचे सूत्रसंचालन केले.

**(विनोद शेलार)**
**प्रसिध्दी प्रमुख**
**भ्रमणध्वनी 9867689540**